मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | शुक्रवार, दि. 28 फेब्रुवारी 2025 | पान- 1


# मालमत्ताकर भरल्याशिवाय वेतन नाही

## 28 फेब्रुवारीपर्यंत कर भरणे सक्तीचे : महापालिका अतिरिक्त आयुक्तांनी दिली कर्मचाऱ्यांना तंबी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन आणि कर आकारणी विभागाकडून मालमत्ता कराचे एक हजार कोटी रुपयांचे उदिष्ठ गाठण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरु आहेत. त्यानूसार पालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही त्यांच्या मालमत्तेचा थकीत कर तत्काळ भरावा, असे आवाहन करण्यात आले आहे. कर न भरल्यास संबंधित कर्मचाऱ्यांना वेतन मिळणार नाही, असा इशाराही अतिरिक्त आयुक्तांनी दिला आहे.




पिंपरी-चिंचवड महापालिकेत आस्थापनेवर सहा हजारांहून अधिक अधिकारी-कर्मचारी कार्यरत आहेत. तर सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारीदेखील तीन ते चार हजार आहेत. त्या सर्वांच्या आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींच्या नावे असलेल्या मालमत्तेचा कर २८ फेब्रुवारीपर्यंत जमा करण्याचे आदेश महापालिकेने काढले आहेत. मालमत्ताकर न भरणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मार्च महिन्याचे वेतन काढले जाणार नाही, असे आदेशात म्हटले आहे. महापालिकेच्या कर संकलन विभागाकडून मालमत्ताकर वसुलीची मोहीम तीव्र करण्यात आली आहे. थकबाकीदारांच्या निवासी व बिगरनिवासी मालमत्ता सील लावून जप्त करण्यात आल्या आहेत. तब्बल ८५० मालमत्ता आत्तापर्यंत सील करण्यात आल्या आहेत. त्यात सर्वाधिक मालमत्ता या बिगरनिवासी आहेत. तर, ४३८ मालमत्तांचा लिलाव करण्यात येत आहे. त्या माध्यमातून मालमत्ताकराची वसुली वाढवण्यावर भर देण्यात आला आहे.

महापालिकेचे बहुतांश अधिकारी व कर्मचारी हे पिंपरी-चिंचवड शहरात राहतात. त्यांच्या व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीच्या नावे शहरात मालमत्ता आहेत. त्यामुळे त्यांनाही मालमत्ताकर भरण्याची सक्ती करण्यात आली आहे. महापालिका आस्थापनावरील तसेच, कंत्राटी, हंगामी, मानधनावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना २८ फेब्रुवारीपर्यंत मालमत्ताकर भरणे सक्तीचे करण्यात आले आहे. तसेच, कुटुंबातील व्यक्तीच्या नावे मालमत्ता असल्यास कर भरण्याची सक्ती करण्यात आली आहे. कर भरल्याची पावती आपल्या विभागातील आस्थापना लिपिकाकडे सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दरम्यान, शहरात मालमत्ता नसल्यास तसे प्रमाणपत्र अधिकारी व कर्मचाऱ्यांना द्यावे लागणार आहे. मालमत्ताकराचे बिल न भरल्यास त्याचे २०२५ मार्च महिन्याचे वेतन अदा करण्यात येणार नाही, असे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी काढलेल्या आदेशात नमूद केले आहे.

### ठेकेदारांनाही मिळणार नाही बिल

**» महापालिकेच्या विविध विभागात हजारो ठेकेदार कामे करतात. लहान-मोठे, ठेकेदार व पुरवठादार महापालिकेची कामे करतात. त्यातील बहुतांश ठेकेदार व त्यांचे प्रतिनिधी पिंपरी-चिंचवड शहरात राहतात. त्यांच्या शहरात मालमत्तादेखील आहेत. त्यांनीही मालमत्ता कर बिलाचा भरणा करावा, असा आदेश काढण्यात आला आहे. त्यांनी मालमत्ता कर भरल्याचे बिल सादर केल्यानंतरच त्याचे बिल अदा करण्यात येणार आहे, असेही अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी सांगितले.**

# महापालिकेच्या रुग्णालयांची अतिरिक्त आयुक्तांकडून पाहणी

## नागरिक, कर्मचाऱ्यांसोबत चर्चा करत सेवा-सुविधा आणि स्वच्छतेचा घेतला आढावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या निर्देशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने देखील शंभर दिवसांचा कृती कार्यक्रम आखला आहे. या अनुषंगाने महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी मंगळवारी (२५ फेब्रुवारी) महानगरपालिकेच्या विविध रुग्णालयांना भेट देत तेथील विभागप्रमुख व कर्मचाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतली. यावेळी त्यांनी नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा आणि सर्व रुग्णालयातील अंतर्गत स्वच्छता मोहीम यावर विशेष भर देण्याच्या सूचना दिल्या.

या दौऱ्यात महानगरपालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत सुपेकर यांच्यासह संबंधित रुग्णालयातील ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. शंभर दिवसांच्या कृती कार्यक्रमांतर्गत महानगरपालिकेच्या सर्व दवाखाने व रुग्णालयातील सेवासुविधा सुलभ करण्यावर भर दिला जाणार असून, तसेच या ठिकाणी अंतर्गत स्वच्छता मोहिमेवर विशेष लक्ष दिले जाणार आहे.



अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी विविध दवाखान्यांची आणि रुग्णालयात पाहणी केली. यावेळी त्यांनी रुग्णालयांतील उपकरणे, बेड्स, फर्निचर व स्वच्छतागृहांची स्थिती यासोबतच ओपीडी सेवांचा दर्जा आणि व्यवस्थापन याची पाहणी केली. उपस्थित रुग्णांसोबत चर्चा करून रुग्णालयातील सोयीसुविधांविषयी त्यांचे अभिप्राय जाणून घेतले. तसेच अनावश्यक वस्तूंची विल्हेवाट आणि कागदपत्रांची योग्य ठेवण याबाबत विभागप्रमुख आणि कर्मचाऱ्यांना सूचना केल्या. सर्व दवाखाने व रुग्णालय इमारतींमध्ये नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्यासाठी योग्य उपाययोजना करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

पिंपरी- वाघेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर दवाखान्याला भेट देत त्यांनी तेथील स्वच्छतागृहे आणि इतर सुविधांची पाहणी केली. यासोबतच कासारवाडी येथील दवाखान्याला देखील भेट देत त्यांनी रुग्ण सेवा सुधारणा, दवाखान्याची अंतर्गत स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, आणि स्वच्छतागृहांची स्थिती यावर लक्ष केंद्रित केले. तसेच स्टोअर रूम व जंक मटेरिअल रूमच्या व्यवस्थापनाची तपासणी करून आवश्यक सूचना दिल्या.

# पुणे महापालिकेच्या अंदाजपत्रकाला मुहूर्त

## महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले महापालिकेचे अंदाजपत्रक स्थायी समितीसमोर सादर करणार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या २०२५-२६ या वर्षाच्या अंदाजपत्रकाला मुहूर्त मिळाला आहे. ४ मार्च रोजी महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले महापालिकेचे अंदाजपत्रक स्थायी समितीसमोर सादर करणार असून, याच दिवशी महापालिकेची मुख्य सभा घेऊन त्याला मंजुरीदेखील मिळण्याची शक्यता आहे. राज्यात महायुतीचे सरकार असल्याने आयुक्तांच्या या अंदाजपत्रकावर भाजपची छाप राहण्याची चर्चा महापालिकेत आहे.



स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात येणारे आयुक्त डॉ. भोसले यांचे हे पहिले आणि अखेरचे अंदाजपत्रक असणार आहे. दोन महिन्यांनी आयुक्त भोसले हे सेवानिवृत्त होत असल्याने या अंदाजपत्रकात पुणेकरांच्या हितासाठी ते कोणत्या योजनांना प्राधान्य देणार, कोणत्या योजनांसाठी किती निधी उपलब्ध करून देणार याकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार आयुक्तांनी १५ जानेवारीपर्यंत स्थायी समितीसमोर अर्थसंकल्प मांडणे आवश्यक आहे.

महापालिकेच्या निवडणुका रखडल्याने गेल्या तीन वर्षांपासून महापालिकेवर प्रशासक राज आहे. महापालिका आयुक्त हेच प्रशासक म्हणून जबाबदारी संभाळत असल्याने सर्वसाधारण सभेत करण्यात आलेल्या ठरावाकडे दुर्लक्ष करून गेल्या तीन वर्षांपासून मार्च महिन्यातच अंदाजपत्रक मांडण्यावर प्रशासक काळातील सर्वच आयुक्तांनी भर दिला आहे. यंदाही ही परंपरा सुरू राहणार आहे. येत्या ४ मार्च रोजी सकाळी ११ वाजता अंदाजपत्रक मांडले जाणार आहे. त्याबाबतचा प्रस्ताव आयुक्तांनी स्थायी समितीला सादर केला आहे.

### अंदाजपत्रकावर भाजपची छाप?

» पालिकेचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी विधान भवन येथे महापालिका अधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या होत्या. आयुक्तांनी घेतलेल्या या बैठकीवर विरोधी पक्षांनी आक्षेप घेऊन सुनावले होते. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी जाहीर कार्यक्रमांमध्येच भाजपच्या नगरसेवकांना, आमदारांना महापालिकेच्या अंदाजपत्रकात मोठा निधी मिळेल, त्याच्या याद्या आयुक्तांकडे दिल्याचे वक्तव्य केले होते. त्यामुळे महापालिका आयुक्तांच्या अंदाजपत्रकामध्ये भाजपच्या नेत्यांना, माजी नगरसेवकांना झुकते माप देण्यात आले का, हे कळणार आहे.

# राजभवनाच्या जागेला राज्य सरकारकडून मान्यता

## पीएमआरडीए मेट्रो प्रवाशांसाठी उन्नत पादचारी पूल (फूट ओव्हर ब्रीज) करणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गिकेत गेल्या अनेक दिवसांपासून सुरक्षा कारणास्तव अडथळा ठरत असलेल्या राजभवनाच्या आवश्यक जागेबाबत अखेर राज्य सरकारकडून मान्यता प्राप्त झाली आहे. त्यामुळे मेट्रो मार्गिकेच्या कामाला आणखी वेग येणार असून, आनंदऋषीजी चौकाजवळील (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रवेशद्वार) विद्यापीठाच्या जागेपासून प्रवाशांसाठी उन्नत पादचारी पूल (फूट ओव्हर ब्रीज) करण्यात येणार आहे.




पुण्यातील वाहतूक कोंडीच्या अनुषंगाने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत (पीएमआरडीए) हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गिका प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. मार्गिकेदरम्यान, पुण्यातील राज्यपालांचे अधिकृत निवासस्थान 'राजभवन' परिसर येत असल्याने या उन्नत प्रकल्पाला सुरक्षेच्या कारणास्तव अडसर निर्माण झाला होता. राजभवनाच्या जागेसमोरून या मेट्रो मार्गाचे काम पूर्ण करण्यासाठी १०० टक्के भूसंपादन करून देण्याची जबाबदारी सरकार म्हणजेच पर्यायाने जिल्हाधिकारी आणि 'पीएमआरडीए'ने घेतली आहे. त्यानुसार सुरक्षिततेच्या कारणास्वत आवश्यक परवानग्या घेण्यासाठी गेल्या अनेक दिवसांपासून विविध बैठका पार पडल्या असून परवानग्या घेण्यात आल्या आहे, अशी माहिती प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

### मुख्यमंत्र्यांची मान्यता

मेट्रो मार्गिका प्रकल्पासाठी एक लाख ८६ हजार ५५९ चौरस फूट जागा लागणार असून, राजभवन वगळता सर्व जागा पीएमआरडीने ताब्यात घेऊन काम सुरू केले होते. मात्र, राजभवनाच्या ८०५५ चौरस मीटर जागेचा प्रश्नाबाबत निर्णय प्रलंबित राहिला होता. पीएमआरडीएकडून राज्य सरकारकडे राजभवनच्या जागेबद्दल मागणी करण्यात आली होती. तसेच सुरक्षिततेबाबत आराखडा सादर करण्यात आला असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही जागा देण्यास मान्यता दिली आहे.

> 'राजभवन'च्या जागेसमोरून जाणाऱ्या मेट्रोच्या अनुषंगाने सुरक्षिततेसाठी पीएमआरडीएने खबरदारी घेऊन मार्गिका मार्ग प्रस्तावित केला आहे. राजभवनासमोरील विद्यापीठाच्या बाजूने प्रवाशांसाठी सुविधा करण्यात आली आहे. त्यासाठी उन्नत पादचारी पूल (फूट ओव्हर ब्रीज) करण्यात येणार आहे.
>
> - रिनाज पठाण, मुख्य अभियंता, पीएमआरडीए

# महापालिका शाळांत 'जेई' प्रतिबंधक लसीकरण मोहीम राबवणार

## सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागातर्फे 1 मार्च 2025 पासून जापनीज एन्सेफलायटीस अर्थात 'जेई' प्रतिबंधक लसीकरण मोहीम

**पिंपरी | प्रतिनिधी**

'जेई' हा विषाणूजन्य आजार असून तो प्रामुख्याने १५ वर्षांखालील मुलांना होतो. या आजारामुळे गंभीर मज्जातंतू विकार होण्याची शक्यता असते. त्यामुळे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागातर्फे १ मार्च २०२५ पासून जापनीज एन्सेफलायटीस अर्थात 'जेई' प्रतिबंधक लसीकरण मोहीम राबवण्यात येणार आहे.

या आजारामुळे गंभीर मज्जातंतू विकार होण्याची शक्यता असते. त्यामुळे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागातर्फे १ मार्च २०२५ पासून जापनीज एन्सेफलायटीस अर्थात 'जेई' प्रतिबंधक लसीकरण मोहीम राबवण्यात येणार आहे.

'जेई' सिंड्रोम हा देशातील सार्वजनिक आरोग्य समस्यांपैकी एक आहे. कारण यामुळे मृत्यूचे प्रमाण सुमारे ३० टक्के आहे, आणि ३०-४० टक्के बरे झालेल्या मुलांमध्ये विशिष्ट परंतु मज्जातंतूशी संबंधित अपंगत्व आयुष्यभर राहते. त्यामुळे या आजारापासून बचावासाठी लसीकरण करण्याचे आवाहन महापालिकेच्या वैद्यकीय विभागातर्फे करण्यात आले आहे. याबाबत महापालिका वैद्यकीय आणि शिक्षण विभागाची संयुक्त बैठक सोमवारी (दि.२४) घेण्यात आली. या बैठकीत शाळांचे आणि पालकांचे सहकार्य आवश्यक असल्याचे डॉ. गोफणे यांनी सांगितले.



तसेच विद्यार्थ्यांना जेई प्रतिबंधक लसीकरणाचे महत्त्व पटवून द्यावे, पालकांसाठी जनजागृती सभा आयोजित कराव्यात, शाळेतील विद्यार्थ्यांची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांना उपलब्ध करून द्यावी, लसीकरण सत्रासाठी जागा आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, सर्व विद्यार्थ्यांनी लस घेतली आहे याची खात्री करावी, अशा विविध सूचना देण्यात आल्या. महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे यांच्या सूचनेनुसार आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. यावेळी शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली ढोणे, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. किशोरी नलावडे, सर्व्हेलन्स मेडिकल ऑफिसर डॉ. चेतन खाडे, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. वर्षा डांगे आणि इतर नोडल अधिकारी उपस्थित होते.

> **'जेई' प्रतिबंधक लसीकरण ही सार्वजनिक आरोग्यासाठी महत्त्वाची मोहीम आहे. पालकांनी व शिक्षकांनी या उपक्रमात सक्रीय सहभाग घ्यावा आणि प्रत्येक बालकाला लसीकरण मिळावे, यासाठी प्रयत्न करावेत. संपूर्ण समाजाने या मोहिमेस सहकार्य करून आपल्या पुढील पिढीचे आरोग्य सुरक्षित करणे आवश्यक आहे.**
> **- शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड, महापालिका**

> **'जेई' लसीकरण हा एक प्रभावी आणि सुरक्षित उपाय असून, लहान मुलांना या घातक आजारापासून वाचवण्यासाठी प्रत्येकाने या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा. जास्तीत जास्त नागरिकांनी याबाबत जागरूक राहावे. आपल्या पाल्यांचे जीवन सुरक्षित करण्यासाठी त्यांना ही लस जरूर द्या.**
> **- डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय विभाग, पिंपरी-चिंचवड**

# अल्पसंख्याक दर्जा घेतलेल्या शिक्षण संस्थाची चौकशी

## पिंपरी-चिंचवडमधील 118 शाळांचा समावेश, आरटीई प्रवेश टाळण्यासाठी काढली पळवाट

**पिंपरी | प्रतिनिधी**

आर्थिकदृष्ट्या मागास मुला-मुलींना २५ टक्के खासगी शिक्षण संस्थेत प्रवेश देणे बंधनकारक आहे. मात्र, राज्याच्या शालेय शिक्षण विभागातून भाषिक अल्पसंख्याक दर्जा मिळवत त्या संस्थांनी पळवाट शोधली आहे. यामुळे पिंपरी-चिंचवडमधील तब्बल ११८ शिक्षण संस्थेत आरटीईच्या मुलामुलींना प्रवेश दिला जात नाही. याबाबत राज्याच्या मुख्यमंत्र्याकडून अल्पसंख्याक म्हणून मान्यता दिलेल्या शाळांच्या अनियमितांची चौकशी सुरु करण्यात आली आहे. यामुळे पिंपरी-चिंचवडमधील अल्पसंख्याक शाळांनी दर्जा मिळवलेल्या या संस्था चौकशीच्या रडारवर आल्या आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरात खासगी शाळांची संख्या वाढत आहे. महापालिका व खासगी अशा ६५० हून अधिक शाळा शहरात आहेत. दरवर्षी नवीन शाळा वाढत असल्या तरी अल्पसंख्यांक शाळांचा आकडा देखील वाढत आहे. ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांना मोफत आणि सक्ती शिक्षण अधिकार कायदा ४ ऑगस्ट २००९ रोजी लागू केला आहे. बालकांच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायद्यानुसार पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले जाते.




आरटीईतून अनुदानित शाळांमध्ये मागेल त्याला मोफत प्रवेश देणे बंधनकारक आहे. मात्र खासगी विनाअनुदानित शाळांतही गरीब व गरजू विद्यार्थ्यांना प्रवेश मिळावा, यासाठी शासनाने २५ टक्के प्रवेश राखीव ठेवले आहेत. मात्र, राज्याच्या शालेय शिक्षण विभागाकडून खासगी शिक्षण संस्थाना भाषिक अल्पसंख्यांक शाळेचे प्रमाणपत्र देण्यात येते. अल्पसंख्याक दर्जा मिळवल्यानंतर शाळांना आरटीई नुसार २५ टक्के आरक्षण देणे बांधनकारक नाही. शहरातील एकूण ११८ शाळांनी भाषिक अल्पसंख्याक प्रमाणपत्र मिळवले आहे. त्यामुळे दरवर्षी आर्थिक दुर्बल घटकातील हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

राईट टू एज्युकेशन कायदा असूनही भाषिक अल्पसंख्यांक दर्जा मिळविल्यामुळे शेकडो शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नाही. अल्पसंख्यांक असणाऱ्या शाळांना आरटीई कायदा लागू नाही. खासगी शाळांना शैक्षणिक सवलती मिळाल्या. पण शाळांमध्ये किती अल्पसंख्यांक विद्यार्थी शिक्षण घेतात असा प्रश्न आहे. दरम्यान, अनेक शाळा शासकीय सवलती लाटण्यासाठी अल्पसंख्यांक दर्जाचे प्रमाणपत्र मिळवत आहेत.

### शाळांनी घेतले खोटे प्रमाणपत्र

» **भाषिक अल्पसंख्याक प्रमाणपत्रासाठी शाळांकडून आर्थिक संगणमताने लाखो रुपयांची लाच दिली जाते. शहरातील अल्पसंख्याक शाळा या राजकीय तसेच बांधकाम क्षेत्रातील व्यक्तींशी निगडीत आहेत. त्यांच्याकडून आरटीई प्रवेश चुकवण्यासाठी अल्पसंख्याक प्रमाणपत्राचा उपयोग केला जात आहे. खोटे अल्पसंख्याक प्रमाणपत्र घेणा-या शाळांची चौकशी करुन त्यांच्यावर शासनाची फसवणूक केली म्हणून फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते दीपक खैरनार यांनी केली आहे.**

### काय आहेत फायदे ?

» **अल्पसंख्याक शिक्षण संस्थाना आरटीई अंतर्गत आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना २५ टक्के प्रवेश देण्याची सक्ती नाही.**

» **राज्याच्या पवित्र पोर्टलवर शिक्षक भरतीची नोंद करण्याची अटही लागू होत नाही.**

» **शिक्षक-कर्मचारी भरतीबाबत बिंदूनामावली लागू होत नाही. केलेल्या भरतीला स्थगिती देता येत नाही.**

# श्रीक्षेत्र भीमाशंकरला सुमारे साडेतीन लाख भाविक

## दीड किलोमीटरपर्यंत दर्शनरांग; 'जंगलवस्ती भीमाशंकर की जय'चा जयघोष

**पुणे | प्रतिनिधी**

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले जिल्ह्यातील श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे महाशिवरात्रीची शासकीय महापूजा मंगळवारी (दि. २५) मध्यरात्री १२ वाजता माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी सपत्नीक करून पवित्र शिवलिंगाचे दर्शन घेतले. त्यानंतर लगेच भाविकांना दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले आहे. सुमारे साडेतीन लाख भाविकांनी पवित्र शिवलिंगाचे दर्शन घेतले. पवित्र शिवलिंगाच्या दर्शनासाठी दर्शनबारीसह मुख दर्शन व पासची सुविधा भाविकांसाठी देवस्थानतर्फे करण्यात आली होती. सुमारे दीड किलोमीटर अंतरापर्यंत दर्शनरांग होती.

'डांकिने भीमाशंकर की जय' व 'जंगलवस्ती भीमाशंकर की जय'च्या जयघोषाने परिसर दुमदुमुन गेला. सुमारे दीड किलोमीटरपर्यंत दर्शनरांग लावून भाविकांनी पवित्र शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी केली होती. महाशिवरात्रीच्या पहाटे शिवलिंगाचे दर्शन महत्त्वाचे मानले जात असल्याने भाविक दोन दिवस आधीच भीमाशंकरमध्ये मुक्कामी होते. दरम्यान, भीमाशंकर मंदिरास फुलांची आकर्षक सजावट व विद्युतरोषणाई भोसरीचे आमदार महेश लांडगे यांच्या वतीने करण्यात आली होती.

सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये अभयारण्यात जंगलात वसलेल्या या मंदिरात महाशिवरात्र यात्रा मोठ्या उत्साहात करण्यात आली. मागील अनेक वर्षांपासून मंदिर परिसरात महाशिवरात्रीची यात्रा आयोजित करण्यात येत आहे. महाशिवरात्रीच्या पहाटे शिवलिंगाचे दर्शन महत्त्वाचे मानले जात असल्याने भाविक दोन दिवस आधीच भीमाशंकरमध्ये मुक्कामी आले होते. त्यामुळे भक्तनिवास, हॉटेल आणि इतर काही ठिकाणी नागरिकांनी भाविकांची राहण्याची व्यवस्था केली होती.

या प्रसंगी पूर्वाताई वळसे पाटील, आमदार महेश लांडगे, सचिन अहिर, आदिवासी नेते सुभाष मोरमारे, पंचायत समितीचे सभापती संजय गवारी, प्रकाश घोलप, जिल्हा बँकेचे माजी उपाध्यक्ष मारुती लोहकरे, देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त, भीमाशंकर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे पाटील, प्रदीप वळसे पाटील, प्रांताधिकारी गोविंद शिंदे, खेड व आंबेगावचे तहसीलदार व सरपंच दत्ता हिले आदी उपस्थित होते. शासकीय विभागाचे सर्व अधिकारी नियंत्रण कक्षात उपस्थित होते.



### पारंपरिक बाजाराला मोठा प्रतिसाद

**» महाशिवरात्रीच्या काळात भीमाशंकर येथे शिवलिंगाच्या दर्शनाबरोबरच कोकणकड्याच्या बाजूला पारंपरिक बाजार भरतो. या यात्रेत अजूनही जुन्या पध्दतीनेच व्यवहार चालतात. मध, कडधान्य, तांदूळ, औषधी वनस्पती यांची खरेदी-विक्री येथे होते. या बाजारात खरेदी करण्यासाठी कोकाणातून लोक येतात. कोकणातील नागरिक त्यांच्याकडील वस्तू देऊन घाटावरील मसाला आणि इतर वस्तू देतात. यंदाही कोकण कड्याजवळ हा मोठा बाजार भरला आहे. या बाजाराला देखील चांगला प्रतिसाद मिळाला.**

### घोडेगाव ते भीमाशंकर रस्त्यावर छोटे-मोठे अपघात

**» या यात्राकाळात घोडेगाव ते भीमाशंकर साइडपट्टी भरण्यात आली नाही. यासह रिफ्लेक्टर, दिशादर्शक फलक तसेच विविध ठिकाणी गतिरोधक देखील उभारण्यात आले नाहीत. परिणामी मोठ्या गर्दीमुळे या रस्त्यावर अनेक छोटे-मोठे अपघात घडले आहेत.**

### एसटी महामंडळ आणि पोलिसांकडून चोख व्यवस्था

**» यात्रेसाठी एसटी महामंडळाने मिनी बस व मोठ्या गाड्यांची व्यवस्था केली होती. पोलिसांकडून वाहनतळ ते भीमाशंकर मंदिर परिसरात घोडेगाव व खेड पोलिस ठाण्यांतर्गत २२ पोलिस अधिकारी, १३४ पोलिस कर्मचारी आणि ६० होमगार्ड, असा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. आरोग्य विभाग, महवितरण विभाग, महसूल विभाग, पंचायत विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. यात्रेत काही अनुचित प्रकार घडू नयेत आणि भाविकांना दर्शन सुलभ होण्यासाठी प्रशासन काळजी घेत होते.**

# शिरूर तालुक्यात रासायनिक खत विक्री करणाऱ्या दुकानदारांचा सुलतानी कारभार !

## रासायनिक खतविक्री दुकानदार खते किंमती पेक्षा अधिक दराने विक्री करत असून युरियाचा मोठा साठा शिल्लक असताना शेतकऱ्यांना युरिया शिल्लक नसल्याचे कारण देत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यात रासायनिक खतविक्री दुकानदार खते किंमती पेक्षा अधिक दराने विक्री करत असून दुसरीकडे युरियाचा मोठा साठा शिल्लक असताना शेतकऱ्यांना युरिया शिल्लक नसल्याचे कारण रासायनिक खत विक्री दुकानदार देत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमधून नाराजीचा सुर उमटत आहे. शिरूर तालुक्यात चाललय तरी काय? कृषी विभाग आर्थिक तडजोडीमुळे निद्रीस्त अवस्थेत असून दुकानदार मात्र बिनधास्त असून शेतकऱ्यांचा खतांसाठी छळ होत आहे. अश्यातच सामाजिक कार्यकर्ते निलेश यशवंत वाळुंज यांनी हा गैरप्रकार उघडकीस आणला आहे.

अनुदानित खतांची विक्री ई-पॉस मशिनद्वारे (E-POS MACHINE) द्वारे करणे खत विक्रेत्यांना बंधनकारक आहे. रासायनिक खतांच्या गोणीवरील छापील किंमतीपेक्षा जास्त दराने विक्रेत्याने विक्री करणे देखील गुन्हा आहे. आणि ह्या घटना काही नवीन देखील नाहीत जवळपास राज्यभर आणि देशभर युरिया सह इतरही अनुदानित खते चढ्या दराने विक्री होत असल्याच्या याविरोधातील अनेकदा विविध प्रसार माध्यमात आणि वृत्तपत्रांत बातम्याही प्रसिद्ध झाल्या शेतकऱ्यांनीही तक्रारी केल्या परंतू परिस्थिती जैसे थे आहे.

अन्नापुर येथील "शेतकरी तथा सामाजिक कार्यकर्ते निलेश यशवंत वाळुंज" यांनी दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी अन्नापूर येथील यशवंत ॲग्रो येथे फ़ोन करून युरिया आहे का? याबाबत विचारणा केली असता संबंधित दुकानात युरिया शिल्लक नसल्याचे सांगण्यात आले,यानंतर वाळुंज यांनी शिरूर येथील "बढे ॲग्रो एजन्सी शिरूर" येथे जाऊन चौकशी केली असता तेथे युरिया उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले परंतु त्यासाठी "३००/- रु लागतील असे सांगण्यात आले, वाळुंज यांनी ही रक्कम "इतर UPI द्वारे दुकानदार यांना क्यूआर कोड द्वारे ऑनलाइन पद्धतीने पाठवली. सुरवातीला साधे बील देण्यात आले होते.

वाळुंज यांनी संगणक बिलाची मागणी केली. त्यानंतर बील देण्यात आले आणि एक गोणी युरिया "छ.शिवाजी महाराज" पुतळ्याजवळ असलेल्या गोदामातून देण्यात आली, युरियाची अनुदान वजा विक्री किंमत २६६.५ आहे परंतु यासाठी जवळपास ३४/- रुपये एका गोणी मागे जास्त घेतले गेले, असल्याने याप्रकरणी वाळुंज यांनी फोन आणि व्हॉट्स ॲप च्या माध्यमातून लेखी तक्रार "तालुका कृषी अधिकारी शिरूर सुवर्णा आदक, जिल्हा कृषी विकास अधिकारी जि.प. अजित पिसाळ, यांच्याकडे केली आहे.



> **ता.कृ.अधिकारी यांनी दोन्ही तक्रारीची खात्री केलेली आहे "ता.कृ.अधिकारी आणि जि.कृ. वि.अधिकाऱ्यांनी(ADO) यांनी योग्य कारवाई आणि उपाय योजना करण्याचे आश्वासन दिले आहे त्याची योग्य पूर्तता तत्काळ तालुक्यात आणि जिल्ह्यात न झाल्यास आदरणीय पद्मभूषण आन्ना हजारे यांचे मार्गदर्शन घेऊन जनआंदोलन करणार आहे.**
>
> **- नीलेश यशवंत वाळुंज (सामाजिक कार्यकर्ते/व्हिसल ब्लोअर)**